!! प्रेसनोट !! दि.२२/०९/२०२१

**<u>सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडुन जेष्ठ नागरीक यांना त्यांचा परदेशी राहणारा मित्र असल्याचे व्हॉटसअप दवारे भासवुन रू १०,००,०००/—ची फसवणुक करणाऱ्या सायबर गुन्हेगारास अटक केलेबाबत</u>**

गुन्हा नोंद क्र. २०/२०२१ कलम ४१९,४२०,५०७ भादवि सह कलम ६६ (क), (ड) आयटी ॲक्ट २०००

मध्य विभाग सायबर पोलीस ठाणेस तक्रारदार नामे अजय मेहता यांनी तक्रार दिली की, त्यांना एका अनोळखी व्हॉटसअप क्रमांकावरून त्यांचा अमेरिका येथे राहणारा मित्र श्रीराम सोमेश्वर याचा व्हाट्सअप डीपी वर फोटो ठेवून तक्रारदार यांना व्हाट्सअप द्वारे मेसेज करून त्याचा मित्र असल्याचे भासविले. त्यास तात्काळ पैशाची गरज असल्याचे सांगून रू १०,००,०००/— त्याच्या बँक खात्यात टाकण्यास भाग पाडले. तक्रारदार यांनी व्हॉटसअप धारकास मेसेज द्वारे त्याने दिलेले पैसे परत मागितले असता फिर्यादीच्या मोबाईलवर बंदुकीचा फोटो पाठवून धमकी दिली. तक्रारदारी यांनी त्याच्या अमेरिकेच्या मित्रास त्याच्या दुसऱ्या क्रमांकावर संपर्क साधुन माहिती दिली असता त्याने असा कोणताही व्हॉटसअप व्दारे संपर्क साधला नसल्याचे कळविल्याने तक्रारदार यांची अनोळखी व्हॉटसअप धारक इसमाने फसवणुक केल्याचे खात्री झाल्याने त्यांनी सायबर पोलीस ठाणे गुन्हा केला होता.

सदर गुन्हयाचे गाभिर्य पाहुन मा. पोलीस उप आयुक्त रश्मी करंदीकर यांनी या गुन्हयाच्या तपासाकरिता मध्य विभाग सायबर पोलीस ठाणेचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गोविलकर, पोलीस उप निरीक्षक अमर कांबळे व पोलीस उप निरीक्षक निलेश हेंबाडे याचे सह दोन पोलीस अंमलदार यांचे एक विशेष पथक तयार करण्यात आले.

सदर पथकाने मा. पोलीस उप आयुक्त रश्मी करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्लिष्ठ व तांत्रिक गुंतागुतीचे विश्लेषण करून आरोपीबाबत माहिती प्राप्त केली. सदरचा आरोपी हा कांदीवली, मुंबई या परिसरात वास्तव्यास असल्याने वर नमुद पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सम्राट सुरेंन्दकुमार चौधरी, वय—४६ वर्षे या आरोपीस शिफातीने पकडुन अटक केली. सदर गुन्हयात अदयापर्यंत रू **८,१३,०००/—** विविध बॅक खातेमध्ये वाचविण्यात/गोठविण्यात आलेले आहेत.

Scanned with CamScanner

वरील आरोपीस मा. न्यायालयात हजर करून पुढील तपास प्रपोनि संजय गोविलकर हे करीत आहेत.

सर्व सामान्य जनता, जेष्ठ नागरीक, महिला यांना याद्वारे आवाहान करण्यात येते की, जर कोणी तुम्हाला व्हॉटसअप द्वारे नातेवाईक, मित्र असल्याचे भासवुन पैस्याची मागणी केली तर प्रथम शहानिशा करून नंतरच मदत करावी तसेच आपल्याशी घडलेल्या सायबर गुन्हेबाबत नजीकच्या पोलीस ठाणेस त्वरीत संपर्क साधावा.

सदरची कारवाई मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री मिलींद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे) श्रीमती रश्मी करंदीकर मुंबई, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (सायबर गुन्हे) श्री नितीन जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, मध्य विभाग सायबर पोलीस ठाणेचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गोविलकर, पोलीस उप निरीक्षक अमर कांबळे व पोलीस उप निरीक्षक निलेश हेंबाडे, पोहक्र ३१४४०/शुक्ला व पोनाक्र. ०१३०८/लोखंडे यांनी केली.

सायबर पोलीस ठाणे, मध्य विभाग
गुन्हे शाखा, मुंबई

**//जय हिंद //**

Scanned with CamScanner